# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (दक्षिण कक्ष) बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.

जा.क्र-२०२१/बैठक-१५२/(९०)/आ.४ दिनांक : २२/०४/२०२२

**प्रति,**
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय** : दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५२व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५२व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

DSD 22/4/22

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी.**

**प्रत:- माहितीसाठी.**
खाजगी सचिव (मा.मंत्री,पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

...२/-

खाजगी सचिव (मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण. यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)

सोबतचे इतिवृत्त मा.राज्यमंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद /अमरावती/नागपूर.

अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.

अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

उप मुख्य लेखाधिकारी (१ २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता तथा मालमत्ता व्यवस्थापन (कक्ष - ९) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता (आय.टी.सेल), मित्तल चेंबर्स, मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना – १/२/३/४/५/६/७/८/९) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर योग्य ती कार्यवाही त्वरित करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५२व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १५२वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली परिषद सभागृह, क्र.२, मुख्य इमारत, ७वा मजला, मंत्रालय, मुंबई येथे बुधवार दिनांक १३ एप्रिल, २०२२ दुपारी १२.०० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.

२) मा.श्री.संजय बनसोडे, राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.

३) श्री.संजीव जयस्वाल, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई

४) श्री.डॉ.दिलीप पांढरपट्टे, सचिव (अतिरिक्त कार्यभार), ग्रामविकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

५) श्री.अभिषेक कृष्णा, सदस्य सचिव म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.राजेंद्र मडके, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

२) श्रीमती दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.

३) श्री. प्रशांत भामरे, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.:- १ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १५१व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५१वी बैठक दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १५१व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** म.जी.प्रा.च्या १५१व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी संपन्न झालेल्या १५१व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १५१व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२१-२२ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२२-२३ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि. १३.०४.२०२२ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२१-२२ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२२-२३ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२१-२२ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२२-२३ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत, कार्यक्रम बाब क्र.३ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे. तसेच खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचे सन २०२१-२२ चे सुधारित अंदाज व सन २०२२-२३ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

(रुपये लक्ष)

| अ.क्र. | तपशिल | सन-२०२१-२२ चे सुधारित अंदाज | सन-२०२२-२३ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | ८५३५८.४६ | १०३२६०.३७ |
| २ | महसुली खर्च | ८५२७८.२४ | १०२११४.४९ |
| ३ | भांडवली जमा | १११९२९.०० | ५९०४१.५८ |
| ४ | भांडवली खर्च | १११९२९.०० | ५९०४१.५८ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

असा ठराव करण्यात येतो की,

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२१-२२ चे सुधारीत व २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अधिकारी/कर्मचारी यांना वेतन व भत्यासाठी नियमित आस्थापनेवरील कर्मचा-यांसाठी थकीत अनुदान रु. ४१.०३ कोटी उपलब्ध करुन द्यावे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे नियमित आस्थापनेवरील कर्मचा-यांसाठी ७ वा वेतन लागु केल्यामुळे रु.३४१.८७ कोटी निधी मागणी केलेली आहे. यामधून म.जी.प्रा.स पहिला हप्त्याची रक्कम रु.७१.६६ कोटी मजीप्रास उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे मजीप्राच्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी सन २०२२-२३ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु.४१८.१५ कोटी अंदाजपत्रकीय तरतुद मागितलेली होती. परंतु शासनाच्या व्हाईट बुक मध्ये सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी सन २०२२-२३ मध्ये रु.२४८.३९ कोटीची अंदाजपत्रकीय तरतुद केली असल्यामुळे रु.१६९.७६ कोटीची तूट दिसून येते. शासनाने सदर अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे.

४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील निवृत्त कर्मचाऱ्यांचे दायित्व शासनाने २३ मार्च, २०१७ च्या शा.नि.अन्वये स्विकारले आहे. तथापि, सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ पर्यंत रु.२१६.७७ कोटी अनुदान शासनाने अद्याप म.जी.प्रा.स उपलब्ध केलेले नाही. हे अनुदान म.जी.प्रा.स उपलब्ध करून द्यावे.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे

**कार्यक्रम बाब क्र.४ :-** राज्याची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू असणा-या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) (स्तर-१) लागू करावयाची कार्यपध्दती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे दि.०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) योजना लागु करण्यासाठी, या कार्यालयाने दि. ३०.३.२०१० रोजीच्या ११६ व्या बैठकीत कार्यक्रम बाब क्र. ५

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

नुसार, मा.संचालक मंडळाची मान्यता घेऊन DCPS योजना म.जी.प्रा.चे परिपत्रक दि. १४ मे, २०१० अन्वये लागु करण्यात आली आहे.

तद्नंतर, शासन निर्णय दि. ०८ ऑक्टोबर, २०२१ अन्वये, शासनाच्या अंशदानात १०% वरुन १४% वाढ झालेली आहे. त्यानुसार, वाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात आला होता. सदर १४% वाढ मान्य करताना NPS लागू करणेबाबत उपरोक्त दि. ०८ ऑक्टोबर, २०२१ च्या शासन निर्णयद्वारे निर्देशित करण्यात आले आहे. त्यानुसार, NPS बाबत शासनाच्या वित्त विभागाने वेळोवेळी काढलेले शासन निर्णय दि. ०६ एप्रिल, २०१५ आणि त्याबाबत निश्चित केलेली कार्यवाहीनुसार मान्यता देण्यात आली आहे.

राज्याची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू असणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) (स्तर-१) लागू करणेबाबत मान्यता देण्यात येते. याबाबत, पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५ :-** पाणी पुरवठा योजना व मलनि:सारण योजना तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामांच्या अंदाजपत्रकांच्या अधिकारामध्ये सुधारणा करणेबाबत.

**संदर्भ :**
१. मजीप्रा परिपत्रक क्र.७७ दि.२.११.२००१
२. मजीप्रा परिपत्रक क्र.८४ दि.१६.१२.२००२
३. मजीप्रा परिपत्रक क्र.१२४ दि.१७.३.२००८
४. मजीप्रा परिपत्रक क्र.१२५ दि.२८.३.२००८
५. सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय क्र.विअसु-२०१५/प्र.क्र.२१८/ इमारती-२ दि.१६.१२.२०१५
६. पाणी पुरवठा स्वच्छता विभागाचे शासन निर्णय क्र.जजीमि-२०१९/प्र.क्र.१३८ (भाग-२)/पापु-१० दि.१०.३.२०२१

विविध कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजना व मलनि:सारण योजना तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामांच्या अंदाजपत्रकांच्या अधिकारामध्ये सुधारणा करणेबाबतच्या प्रस्तावाची माहिती कार्यक्रम बाबीनुसार मा.संचालक मंडळाच्या बैठकीसमोर पुढीलप्रमाणे सादर करण्यात आली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

संदर्भ क्र.१, २, ३ व ४ च्या परिपत्रकांन्वये ग्रामीण व नागरी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना व मलनि:सारण योजना तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामांच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मंजूरी देण्याच्या अधिकारामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये संदर्भ क्र.५ च्या शासन निर्णयानुसार, त्यांच्या विभागात प्रचलित असलेल्या तांत्रिक मंजूरीच्या अधिकाराबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

संदर्भ क्र.६ च्या शासन निर्णयानुसार जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांना तांत्रिक मंजूरी देण्याबाबतच्या अधिकाराबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

वरीलप्रमाणे विविध कामांसाठी तांत्रिक मंजूरीबाबत वेगवेगळे अधिकार असल्याने, त्यामध्ये एकसमानता आणण्याची आवश्यकता आहे.

या प्रकरणी पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

तांत्रिक मंजूरीच्या विविध अधिकारांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **तपशील** | **अधिकार** | | | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| | | **कार्यकारी अभियंता** | **अधीक्षक अभियंता** | **मुख्य अभियंता** | |
| १) | मजीप्रा परिपत्रक क्र.१२४ | रु.७५ लक्ष पर्यंत | रु.७५ ते २५० लक्ष पर्यंत | पूर्ण अधिकार | |
| २) | सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय दि.१६.१२.२०१५ | रु.१०० लक्ष | रु.२५० लक्ष | पूर्ण अधिकार | |
| ३) | पाणी पुरवठा विभागाचे शासन निर्णय दि.१०.३.२०२१ | रु.२०० लक्ष | रु.५०० लक्ष | पूर्ण अधिकार | |

सध्या जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत राबवावयाच्या योजनांच्या बाबतीत अ.क्र.३ नुसार व इतर सर्व कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजना, मलनि:सारण योजना तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध विकास कामांना अ.क्र.१ नुसार तांत्रिक मंजूरी देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे अस्तित्वातील तांत्रिक मंजूरीच्या अधिकारामध्ये सुधारणा केल्यास, ग्रामीण, नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांच्या कामांची अंमलबजावणी शीघ्रगतीने होण्यास मदत होईल तसेच विविध कार्यक्रमांत योजनांच्या तांत्रिक मंजूरीच्या अधिकारामध्ये एकसमानता राहील.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन तांत्रिक मंजूरीचे अधिकार पुढीलप्रमाणे ठेवण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | तपशील | अधिकार | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता | |
| १) | ग्रामीण स्वतंत्र/ प्रादेशिक/नागरी/ पाणी पुरवठा योजना, मलनि:सारण योजना पूर्ण ठेव तत्वावरील योजना, स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त होणारे विविध विकास कामांचे प्रस्ताव. | रु.२ कोटी | रु.२ ते ५ कोटी | पूर्ण अधिकार | |

वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत म.जी.प्रा.च्या मा. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा होऊन निर्णय होण्यास विनंती करण्यात येत आहे.

वरील प्रस्तावाबाबत मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन सदर प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

याबाबत मा.संचालक मंडळ मान्यता देत असून, पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात येत आहे.

योजनांची कामे शीघ्रगतीने होण्याच्या दृष्टीने तांत्रिक मंजूरीचा अधिकार पुढीलप्रमाणे ठेवण्यात यावा.

| अ. क्र. | तपशील | अधिकार | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता | |
| १) | ग्रामीण स्वतंत्र/ प्रादेशिक/नागरी/ पाणी पुरवठा योजना, मलनि:सारण योजना पूर्ण ठेव तत्वावरील योजना, स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त होणारे विविध विकास कामांचे प्रस्ताव इत्यादि. | रु.२ कोटी | रु.२ ते ५ कोटी | पूर्ण अधिकार | |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

उपरोक्त प्रमाणे तांत्रिक मंजूरीचे अधिकार सर्व क्षेत्रिय कार्यालयांना परिपत्रकाव्दारे निर्गमित करावे. त्याचप्रमाणे म.जी.प्रा.ची तांत्रिक मंजूरीची यापूर्वीची परिपत्रके अधिक्रमीत करावीत. याबाबत पुढील कार्यवाही करण्याकरिता मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६ :-** राज्य सार्वजनिक उपक्रमाचा तात्पुरता शिल्लक निधी शासनाच्या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने राष्ट्रीयकृत बँकांमध्ये केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.१३.०४.२०२२ रोजी संपन्न झाली महाराष्ट्र जीवन प्राधिकारण कडील शिल्लक निधी राज्य शासनाचा शासन निर्णय वित्त विभाग क्र.शासाऊ -१०.१५/प्र.क्र.४२/सा.ऊ. दि. २७.१०.२०१५ व वित्त विभाग क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५ दि.१३.०३.२०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार अल्प व दिर्घ मुदतीत गुंतवणुक करण्यात येत असते. तसेच तीच अल्प व दिर्घ मुदतीची गुंतवणुक दि.१३.०३.२०२० च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार राष्ट्रीयकृत बँकेमध्ये करण्यात आलेली आहे.

**ठराव :**

महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाने दि. १९.०६.२०२० ते ३०.०९.२०२१ या कालावधीमध्ये केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीचा गुंतवणुकीस मान्यता देण्यात येत आहे. याबाबत आवश्यक पुढील कार्यवाहीसाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उपविधी-१५ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांकडील पाणीपट्टीवरील विलंब शुल्क माफ करण्यासंदर्भात सुधारणा करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.१३/०४/२०२२ रोजी संपन्न झाली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळ) उपविधी (bye-laws) महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.२५ जानेवारी, १९९० (भाग-२) मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. त्यामधील उपविधी क्र. १५ मध्ये पाणी पुरवठयाचे दर निश्चितीचे अधिकार तसेच थकीत पाणी बिलाच्या रकमेवर १% दराने विलंब शुल्क आकारण्याचे अधिकार प्राप्त आहेत. परंतु सदर

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

अधिनियमामध्ये विलंब शुल्क माफ/कमी करण्याबाबत उल्लेख केलेला नाही. शासनाने प्राधिकरणास विलंब शुल्क माफीबाबतचे अधिकार प्राप्त करुन घेण्याबाबत सुचना दिली आहे. शासनाच्या या सुचनेप्रमाणे पाणीपट्टीवरील विलंब शुल्क आकारणी/माफी/कमी करणेबाबतचे अधिकार प्राधिकरणाच्या संचालक मंडळास असतील अशी उपविधी मध्ये दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली असून खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव:**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २५ जानेवारी, १९९० (भाग-२) मधील उपविधी-१५ (bye-laws) मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येणा-या पाणी पुरवठा योजनांच्या बाबत पाणीपट्टी विलंब आकाराचा दर व विलंब शुल्क माफ/कमी करण्याचे प्राधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळास असतील. याबाबत आवश्यक पुढील कार्यवाहीसाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८ :-** श्री.अभिषेक कृष्णा (भा.प्र.से.), सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेसाठी भाडेतत्वावर निवासस्थान उपलब्ध करुन देणेबाबत.

उपरोक्त प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची मान्यता मिळाली असून त्याअनुषंगाने खालील ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.अभिषेक कृष्णा हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सदस्य सचिव या पदावर कार्यरत असेपर्यत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत त्यांना भाडेतत्वावर निवासस्थान उपलब्ध करुन देऊन तसेच त्यांना दरमहा मिळणा-या वेतनातून घरभाडे भत्ता व सेवाशुल्क हया रक्कमा वजातीय करुन उर्वरित वेतन अदा करावयासाठी संचालक मंडळ या ठरावाद्वारे मान्यता देत आहे. तसेच या अनुषंगाने पुढील सर्व आवश्यक कार्यवाहीसाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.९ :-** जल जीवन मिशनची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत व योजना कालावधीत कामे पुर्ण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने वाढीव परिमाण व अतिरिक्त बाब मंजूरीच्या अधिकारामध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव.

जल जीवन मिशनची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत व योजना कालावधीत कामे पूर्ण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने वाढीव परिमाण व अतिरिक्त बाब मंजूरीच्या अधिकारामध्ये सुधारणा करण्याबाबतच्या प्रस्तावाची माहिती कार्यक्रम बाबीनुसार मा.संचालक मंडळाच्या बैठकीसमोर पुढीलप्रमाणे सादर करण्यात आली.

जल जीवन मिशनची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत व योजना कालावधीत कामे पूर्ण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी करताना कामाच्या निकडीनुसार योजनेच्या निविदेंतर्गत उद्भवणाऱ्या वाढीव परिमाण व अतिरिक्त बाब प्रस्तावांच्या मंजूरीच्या अधिकारामध्ये वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावास मा.संचालक मंडळाच्या दि.८.९.२०२१ रोजी संपन्न झालेल्या १५० व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्यानुसार, या कार्यालयाचे पत्र क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/११७२, दि.२२.९.२०२१ अन्वये, मजीप्रा परिपत्रक क्र.२३८ निर्गमित करण्यात आले आहे. सदर परिपत्रक निर्गमित करताना, मजीप्रा परिपत्रक क्र.८० दि.१.८.२००२ अधिक्रमित करुन वाढीव परिमाण व अतिरिक्त बाब प्रस्तावांच्या विविध स्तरावरील मंजूरीच्या अधिकाराची मर्यादा काही अटी व शर्तींच्या अधिन राहून वाढविण्यात आली आहे.

सदर अटीमध्ये, "कलम-३८ तसेच अतिरिक्त बाब प्रस्तावांची एकूण किंमत स्वीकृत निविदा किंमतीच्या १० टक्के पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी" या अटीचा समावेश करण्यात आला आहे. या अटीमुळे सदर प्रस्ताव मंजूरीअभावी कंत्राटदारास देयकांची अदायगी करण्यास विलंब होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम योजनेच्या कामाच्या प्रगतीवर होऊन, जल जीवन मिशनचे उद्दिष्ट विहीत मुदतीत साध्य करण्यास अडचणी येऊ शकतात. या बाबीची विचार करता, वाढीव परिमाण व अतिरिक्त बाब प्रस्तावांना मुदतीत मान्यता देणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

सध्या जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत कामे प्रगतीपथावर असून या योजनांच्या काही निविदांतर्गत क्षेत्रिय परिस्थितीनुसार उद्भवलेल्या बदलामुळे योजनांच्या कार्यान्वयनासाठी कलम-३८ नुसार वाढीव परिमाणे व अतिरिक्त बाब राबविणे क्रमप्राप्त आहे. ही कामे विहीत मुदतीत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे निविदा किंमतीच्या १०% पेक्षा जास्त किंमतीच्या कलम-३८ तसेच अतिरिक्त बाबींच्या प्रस्तावांच्या बाबतीत कामे वेळेवर मार्गी लागण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करीत आहे.

योजना पूर्णत्वाचा एकूण खर्च हा मंजूर योजनेच्या किंमतीपेक्षा जास्त होणार नाही अशा प्रकरणी निविदा किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त किंमतीच्या वाढीव परिमाण किंवा अतिरिक्त बाब प्रस्ताव मंजूरीच्या बाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना राहील. योजनेवर मंजूर किंमतीपेक्षा जास्त खर्च अपेक्षित असेल तर अशा प्रकरणी शासनाची मंजूरी प्राप्त करुन घेऊन वाढीव परिमाण किंवा अतिरिक्त बाब प्रस्तावांना मंजूरी देणे आवश्यक राहील.

संचालक मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर, मजीप्रा परिपत्रक क्र.२३८ चे शुध्दीपत्रकाव्दारे क्षेत्रिय कार्यालयास कळविण्याचे प्रस्तावित आहे. याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा निर्णय होणेस विनंती आहे.

वरील प्रस्तावाबाबत मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन सदर प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

वाढीव परिमाण व अतिरिक्त बाब प्रस्तावांच्या विविध स्तरावरील मंजूरीच्या अधिकाराची मर्यादा मा.संचालक मंडळाच्या दि.८.९.२०२१ रोजी संपन्न झालेल्या १५० व्या बैठकीत काही अटी व शर्तीच्या अधिन राहून वाढविण्यात आली आहे.

सदर प्रकरणी, "कलम-३८ तसेच अतिरिक्त बाब प्रस्तावांची एकूण किंमत स्वीकृत निविदा किंमतीच्या १० टक्के पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी" या अटीचा समावेश करण्यात आला आहे. त्याऐवजी योजना पूर्णत्वाचा एकूण खर्च हा मंजूर योजनेच्या किंमतीपेक्षा जास्त होणार नाही अशा प्रकरणी निविदा किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त किंमतीच्या वाढीव परिमाण किंवा अतिरिक्त बाब प्रस्ताव मंजूरीच्या बाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना राहील. योजनेवर मंजूर किंमतीपेक्षा जास्त खर्च अपेक्षित असेल तर अशा प्रकरणी शासनाची

अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

मंजूरी प्राप्त करुन घेऊन वाढीव परिमाण किंवा अतिरिक्त बाब प्रस्तावांना मंजूरी देणे आवश्यक राहील. या प्रस्तावास संचालक मंडळ मान्यता देत आहे. याबाबत सुधारित सूचना परिपत्रकाव्दारे निर्गमित करण्यासाठी सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१० :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत बजावण्यात आलेल्या शिक्षेबाबत झालेल्या अपिलातील निर्णयाच्या अनुषंगाने पुनरिक्षण/पुनर्विलोकन प्राधिकारी नियुक्त करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत बजावण्यात आलेल्या शिक्षेबाबत झालेल्या अपिलातील निर्णयाच्या अनुषंगाने म.ना.से.(शिस्त व अपील ) नियम, १९७९ मधील नियम २५ नुसार पुनरीक्षण व नियम २५ (अ) नुसार पुनर्विलोकनाबाबत खालील प्रमाणे गट-अ व गट-ब मधील अधिका-यांचे प्राधिकार मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना आणि गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांचे प्राधिकार मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना शासनाच्या मान्यतेने प्रदान करण्यास तसेच सदर निर्णय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या स्तरावर पुनरीक्षण/ पुनर्विलोकनाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत दाखल करण्यात आलेली आणि सदर ठरावाच्या दिनांकापूर्वी विचाराधीन असणारी प्रलंबित प्रकरणे वगळता इतर प्रकरणांना आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यास आणि त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यास मा.संचालक मंडळाने ठरावास मान्यता दिली.

| अ. क्र. | ज्या अधिकारी/कर्मचा-याला शिक्षा बजावावयाची आहे तो अधिकारी/ कर्मचारी | पुनरीक्षण प्राधिकारी/ पुनर्विलोकन प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | अ.अ./मु.अ./उ.मु.ले.अ./मु.प्र.अ./का.अ./ आ.अ.(द.)/ प्र.नि आ.अ./ का. व का. अ./ उप अभि. (केंद्रिय ) /सहा. अभि. श्रे.१ (केंद्रिय ) | मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (अ.मु.स./प्रधान सचिव /सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेमार्फत) |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | |
|---|---|---|
| २ | व.ले.अ./अं.ले.प.अ./ले.अ./सहा.ले.अ./उप अभियंता (क्षेत्रिय)/ सहा.अभि.श्रे.१ (क्षेत्रिय) /शा.अ. /स.अ.श्रे.२/ विशेष अधीक्षक /कक्ष अधिकारी | मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| ३ | तांत्रिक/अतांत्रिक वर्ग-३/ वर्ग-४ कर्मचारी | मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |

**कार्यक्रम बाब क्र.११ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांना दिनांक १/१/२०१६ ते दिनांक ३१/३/२०१७ या कालावधीसाठी सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचना मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांना दिनांक १.१.२०१६ ते दिनांक ३१.३.२०१७ या कालावधीसाठी सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचना मंजूर करण्याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ मधील कलम (२) (ब) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.२३.९.२०२१ च्या शासन निर्णयामध्ये नमुद अटी व शर्तीनुसार तसेच परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर (वेतन संरचना) दि. ०१.०१.२०१६ ते दि. ३१.०३.२०१७ या कालावधीसाठी लागू करण्यास संचालक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. त्यानुषंगाने प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची संचालक मंडळाची शिफारस आहे. तसेच दि.०१.०१.२०१६ पासून रुपांतरित आस्थापनेवरील कर्मचा-यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उत्पन्नातून सातवा वेतन आयोग लागू करण्यास व त्या अनुषंगाने अनुज्ञेय थकबाकी ही शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अदा करण्यास संचालक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

तसेच दि.०१.०१.२०१६ ते दि. ३१.०३.२०१७ या कालावधीतील सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तरानुसार वेतन निश्चिती केल्यामुळे येणारी थकबाकी ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उत्पन्नातून शासनाच्या मान्यतेने व निर्देशानुसार अदायगी करण्यासही संचालक

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

मंडळाची मान्यता आहे. व सातव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती दि.१.१.२०१६ पासून लागू करावयाची असल्याने दि.१.४.२०१७ पासूनची यापुर्वी केलेली वेतननिश्चिती बदलणार असल्याने व तद्अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना देय होणा-या थकबाकीच्या रक्कमेतही वाढ होणार असल्याने याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वर प्रस्तावित केल्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील नियमित व तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना तसेच रुपांतरीत अस्थायी/ स्थायी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना दि.०१.०१.२०१६ ते ३१.३.२०१७ या कालावधीतील सातवा वेतन आयोग लागू करण्याकरिता शिफारशीसह प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्रमांक-१ :**

विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दिनांक २९.५.२००६ च्या परिपत्रकान्वये "जलसवेक" या संवर्गामध्ये पाणी पुरवठा केंद्रावरील १४ संवर्गातील कर्मचा-यांना समाविष्ठ करण्यात आले. तथापि, त्यांना त्यांचे मुळ संवर्गानुसार सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्चिती करण्यासाठी संचालक मंडळाची मान्यता घेणेबाबत.

**ठराव :**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०३ व्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता दिल्यानुसार दि.२९.५.२००६ च्या परिपत्रकानुसार जल सेवक हा संवर्ग प्राधिकरणाने १४ संवर्ग एकत्रित करुन प्रशासकीय कारणास्तव एकच तयार केला होता परंतू सातव्या वेतन आयोगानुसार परिशिष्ट "अ" नुसार वेतन निश्चिती करताना तांत्रिक अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे ह्या १४ संवर्गातील कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती ही त्यांच्या मुळ संवर्गानुसार करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्यांच्या दि.२९.५.२००६ च्या परिपत्रकानुसार त्यांचा कामाच्या स्वरुपात काहीही बदल होणार नाही.

तसेच सातव्या वेतन आयोगातील परिशिष्ट -अ मधील समकक्ष वेतनश्रेणी असणारे व परिपत्रकातील सर्व चौदा संवर्गासाठी समकक्ष असणारे पद मदतनीस हा संवर्ग वेतनश्रेणी S-१: १५०००-४७६०० करणेस मान्यता देण्यात येत आहे.

या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.